# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र






०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४३३ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक १८/०८/२०१८

## विशेष वार्तापत्र

## पोलीस मुख्यालयात १५ ऑगस्ट स्वतंत्रता दिवस साजरा

भंडारा :– येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर दि. १५/०८/२०१८ रोजी १५ ऑगस्ट स्वतंत्र दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. ना. श्री. महादेव जानकर, मंत्री, पंशुसंवर्धन, दुग्धविकास मत्सव्यवसाय, व मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. शांतनु गोयल हे होते. तसेच मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनिता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने करण्यात आली. व ध्वजारोहण मा. ना. श्री. महादेव जानकर, मंत्री, पंशुसंवर्धन, दुग्धविकास मत्सव्यवसाय, व मा. जिल्हाधिकारी भंडारा यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने मा. ना. श्री. महादेव जानकर, मंत्री, पंशुसंवर्धन, दुग्धविकास मत्सव्यवसाय, यांनी आपल्या भाषणामध्ये पत्रकार, माजी सैनीक, शिक्षक, कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी आलेल्या सर्व उपस्थितांचे आनंद व्यक्त केले. शेती विकास व शेतकरी हा शासनाचा केंन्द्रबिंदु असून शेतकऱ्यांना शिवाजी महाराज कृषी सन्मान योंजनेच्या माध्यमातुन जिल्हयातील ६५ हजार २८५ शेतकऱ्यांना १८५ कोटी रुपये कर्जमाफीपासुन लाभ होणार आहे. कर्जमाफीपासून एकहीपात्र शेतकरी लाभार्थी वंचीत राहणार नाही. याची काळजी घेण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनामार्फत जिल्यात विवीध यशस्वीपणे राबविल्या जात असुन नागरीकांना शासनाच्या सर्व सुविधा तात्काळ व अचूक मिळण्यासाठी डिजीटल महाराष्ट्र संकल्पना शासन राबवित आहे. या अंतर्ग सातबारा संगणीकरण हे महत्वाचे कार्य महसुल प्रशासनाचे वतीने केले जात आहे. भंडारा जिल्हयात ५ लाख ७५ हजार सातबारा संगणीकरण करण्यात आले आहे. दृष्काळमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी शासनाने महत्वाकांक्षी असे जलयुक्त शिवार राबविण्याचा निर्णय घेतला आहे. आपला व्यवसाय सुरु करुन दुसऱ्यांना रोजगारांची जिद्द असणाऱ्या तरुण तरुणीसाठी केंन्द्र सरकारने पंतप्रधान मंत्री योजने अंतर्गत मुद्रा योजना यशस्वी राबविल्याचे सांगीतले. भंडारा हा मामा तलावाचा जिल्हा असुन गोंड प्रशासन कालीन ११५३ मामा तलाव जिल्हयात आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनच्या वतीने युवा माहिती ग्रुप हा उपक्रम सुरु होत आहे. या उपक्रमात मोठया प्रमाणात तरुण, तरुणीने सहभाग घ्यावे. भंडारा जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने फिरते पोलीस स्टेशन हा उपक्रम अंतर्गत १२२३ गावामध्ये फिरते पोलीस स्टेशन उपक्रम घेण्यात आला. असुन यामध्ये ५८,००० लोकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला यावेळी २५४ निकाली काढण्यात आले. या नावीन्यपुर्ण उपक्रमासासाठी मान्यवरांनी अभिनंदन व्यक्त केले.

त्यानंतर मंत्री मोहदयांनी परेडचे निरीक्षण केले. यावेळी भंडारा जिल्हा पोलीस दल, भंडारा गृहरक्षक दल, जे. एम. पटेल महाविद्यालय ज्युनीयर कॉलेज भंडारा, नुतन कन्या महाविद्यालय ज्युनीयर कॉलेज भंडारा येथील एन. सी. पथक, दामीणी पथक, पोलीस बॅन्ड पथक, पोलीस श्वान पथक, दामीनी पथक, पोलीस जनजागृती चित्ररथ, राष्ट्रीय तंबाखु पथक मिळुन अशा १२ पथंकाचा समावेश होता. यावेळी परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम साळी हे होते. तसेच दुय्यम परेड कमांडर मधुकर प्रधान पोलीस उपनिरीक्षक पो. मु. भंडारा हे करीत होते.

कार्यक्रमाच्या शेवटी पारितोषिके वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. पोलीस महासंचालक यांचेकडून सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्रे मिळाली असून मा. मंत्री महोदयांचे हस्ते प्रमाणपत्र देवुन सत्कार करण्यात आले. १) श्री. क्रिष्णा हत्तीमारे, पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय भंडारा, २) श्री. दिलीप भांडारकर पोलीस हवालदार, पोलीस मुख्यालय भंडारा, ३) श्री. उत्तम वानखेडे पोलीस हवालदार, पोलीस मुख्यालय भंडारा, ४) श्री. राजकुमार बौध्द, पोलीस हवालदार पोलीस स्टेशन तुमसर, ५) श्री. ग्यानीराम गोंबाडे पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन साकोली ६) चंद्रमणी तभाणे, नायक पोलीस शिपाई पोलीस मुख्यालय भंडारा त्याच प्रमाणे वेगवेगळया योजने अंतर्गत उत्कुष्ट कामगिरी करणाऱ्यांना तसेच प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाअंतर्गत उत्कृष्ट काम केल्याबद्दल डॉ. सुनिता बढे, अतिरीक्त शल्य चिकीत्सक सामान्य रुग्नालय भंडारा, प्रसुती पश्चात गर्भ निरोधक तांबी, सिजेरीयन प्रसुती व स्त्री कुंटुब नियोजन शस्त्रक्रिया यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल डॉ. अनमू बागडे, वैद्यकिय अधिकारी सामान्य रुग्नालय भंडारा, अंधश्रध्देला आहारी जाणाऱ्या कुंटुबांना व नागरीकांना परिवर्तन करण्यास व त्यापासून घडणारे गुन्हे थांबविण्यास पोलीस विभागाला सहकार्य केल्याबद्दल श्री. विष्णुदास बाबुराव लोणारे, महाराष्ट्र अंधश्रध्दा निमुर्लन समिती सदस्य, दिनांक ३१/०७/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजता वैनगंगा नदीमध्ये श्री. रवि पंचबुधे राहणार आंबेडकर वार्ड भंडारा हा पाण्यात गटांगडया खत असतांनाच कनोईग ॲण्ड कयाकिंग या खेळाचा सरावासाठी पुलाजवळ उभ्या असलेल्या अविनाश निंबार्तेच्या लक्षात येताच त्याने पुलावाजवळ उभ्या असलेल्या अविनाश निंबार्तेच्या लक्षात येताच त्याने पुलावरुन पाण्यात उडी घेवुन रवि पंचबुध्देचा जीव वाचविला या उल्लेखनिय कामगिरीबद्दल या सर्वानी केलेल्या कामगिरीबद्दल प्रमाणपत्र देवून गौरान्वीत करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला मा.ना. श्री. महादेव जानकर, मंत्री, पंशुसंवर्धन, दुग्धविकास मत्सव्यवसाय, मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू, जिल्हा माहीती अधिकारी रवि गिते, भंडारा, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड भंडारा, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. तिक्कस पवनी राखीव पोलीस उपनिरीक्षक प्रधान, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच भंडारा पोलीस दलातील विविध शाखेचे/पोस्टेचे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, ईलेक्ट्रॉक मिडीया, पत्रकार बंधु, व मोठया प्रमाणात विविध क्षेत्रातील जनसमुह उपस्थित होता. कार्यक्राचे सुत्रसंचालन श्रीमती स्मिता गालफाडे व प्रमोद सेलोकर यांनी केले.

**(जितेद्रं के आडोळे)**
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**संपर्क क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.